वन महोत्सव २०१९-२०
वन महोत्सव कालावधीत करावयाच्या
रोपांच्या वाटप व विक्री दराबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. साववि-२०१९/प्र.क्र. ५४/फ-११,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :-१५/०६/२०१९

वाचा :- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. साववि-२०१५/प्र.क्र.१३१/फ-११ दिनांक : ३१ मार्च, २०१६.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. सा.व.वि-२०१८/प्र.क्र.८५/फ-११ दिनांक : १५ जून २०१८.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे पत्र जा.क्र. कक्ष-१/सांख्यिकी/रो.वि.द./२७०/ सन २०१९-२० दि. २४.०५.२०१९.
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/रोहयो/ प्र.क्र.१४(२) /भाग-३/३४९/१९-२०,दि. ११.०६.२०१९.

प्रस्तावना :-

दि. १५ जून ते ३० सप्टेंबर हा काळ वन महोत्सवाचा काळ म्हणून दरवर्षी साजरा करण्यात येतो. या कालावधीत वृक्षलागवडीसाठी लोकांना उद्युक्त करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत सवलतीच्या दराने रोपांचा पुरवठा करण्यात येत असतो. वृक्ष लागवड व संगोपन हा लोकांचा कार्यक्रम व्हावा, त्याचबरोबर जनतेला वनीकरणाचे महत्व पटवून देता यावे. या दृष्टीने वन महोत्सवाच्या कालावधीत सुधारीत सवलतीच्या दराप्रमाणे रोपांचा पुरवठा केला जातो. त्यानुसार संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये सन २०१८-१९ साठी सदर योजना पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली होती. आता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात सदर योजना चालू ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१. सन २०१८-१९ या वर्षातील अनुभव तसेच जनतेचा प्रतिसाद लक्षात घेवून, ही योजना सन २०१९-२० या आर्थिक वर्षात **दिनांक १५ जून २०१९ ते ३० सप्टेंबर २०१९** या वन महोत्सवाच्या कालावधीत पुढे चालू ठेवण्यास व ती प्रभावीपणे राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यात सन २०१७ पासून “५० कोटी वृक्ष लागवड” हा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२० या वर्षासाठी ३३ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत खाजगी मालकीचे पडीक क्षेत्र आणि शेत बांधावर, रेल्वे दुतर्फा, कालवा दुतर्फा तसेच रस्ता दुतर्फा क्षेत्रात, सामूहीक पडीक क्षेत्र व गायरान क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेता यावा. तसेच सर्व सामान्य शेतकरी व वृक्षप्रेमी यांना अल्पदरात रोपे उपलब्ध व्हावीत यासाठी वनमहोत्सवाच्या कालावधीत सवलतीच्या दरात रोपांचा पुरवठा करण्यात येईल. वन महोत्सवाच्या कालावधीत आणि सर्वसाधारण कालावधीत रोपांचा पुरवठा, सन २०१९-२० या आर्थिक वर्षात खाली नमूद केलेल्या सवलतीच्या दराप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	रोपांचे वर्गीकरण	वनमहोत्सव कालावधीतील रोप विक्रीचे दर (रूपये)	सर्वसाधारण कालावधीतील रोप विक्रीचे दर (रूपये)
१.	९ महिन्याचे रोप (लहान पिशवीतील रोप)	८	१५
२.	१८ महिन्याचे रोप (मोठ्या पिशवीतील रोप)	४०	७५

३. सामाजिक वनीकरण विभागामार्फत तुतीची रोपे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MREGS) अंतर्गत तयार करुन ती मोफत रेशीम विभागास उपलब्ध करुन दिली जाईल. रेशीम विभागामार्फत सदर रोपांचा पुरवठा शेतकऱ्यांना केला जाईल.

४. राज्यात सन २०१७ पासून शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत दिनांक १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीत, ३३ कोटी वृक्ष लागवड करणेसाठी सर्व शासकीय यंत्रणा व आस्थापना तसेच निमशासकीय यंत्रणा व लोकांना मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड कार्यक्रमात सहभाग घेता यावा, यासाठी वरीलप्रमाणे अत्यल्प व सवलतीचे दरात रोपांचा पुरवठा करण्यात येत आहे.

५. ज्या शासकीय यंत्रणांनी ५० कोटी वृक्ष लागवडीत सहभाग घेतला आहे, अशा यंत्रणांना रोप निर्मिती साठी कोणत्याही प्रकारची आर्थिक तरतूद नसल्यास, अशा यंत्रणांना या वनमहोत्सव कालावधीत रोपांचा मोफत पुरवठा केला जाईल. यासाठी त्यांनी लागणा-या रोपांची आगाऊ मागणी लगतचे उपवनसंरक्षक (सदस्य सचिव, ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम यांचेकडे सोबतच्या मागणी पत्राद्वारे करावी.

६. उपवनसंरक्षक तथा सदस्य सचिव, ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम हे जिल्ह्यात उपलब्ध प्रादेशिक/ सामाजिक वनीकरण रोपवाटीकेमधून यंत्रणानिहाय रोप पुरवठ्याचे आदेश दि. २५/०६/२०१९ पूर्वी निर्गमित करतील व इतर यंत्रणेशी योग्य समन्वय साधतील.

७. संदर्भ क्र. १ मधील दि. ३१/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे वनमहोत्सव काळात वन व सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटीकांमधून सवलतीच्या दराने रोपांचा पुरवठा केला जातो. या योजनेचा फायदा सर्व संबंधित विभागांनी घ्यावा. जिथे अडचण असेल तिथे वन व सामाजिक वनीकरण विभागाकडून मोफत रोपे देण्याचा प्रयत्न केला जाईल. मात्र त्याबाबतची आवश्यक नोंद आणि लेखा (Account), रोपे उपलब्ध करून घेणारा विभाग आणि रोपे उपलब्ध करून देणारा विभाग अशा दोन्ही विभागामार्फत ठेवण्यात यावे. याबाबतची माहिती व अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचेकडे पाठवावी.

८. वनमहोत्सवाच्या कालावधीत (१५ जून ते ३० सप्टेंबर) वनमहोत्सवाचे प्रयोजन व महत्व याबाबत प्रभावीपणे सर्वदूर पोहोचणा-या माध्यमातून योग्य प्रसिद्धी देण्यात यावी. तसेच वृक्ष लागवड व संवर्धन मेळावे व तत्सम कार्यक्रम राबविण्यात यावेत. यासाठी लागणारा खर्च "प्रसार, प्रसिद्धी व प्रशिक्षण (२४०६ ८५८९) " या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०१९-२० मधील मंजूर तरतूदीतून मागविण्यात यावा.

९. उपवनसंरक्षक (सदस्य सचिव, ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम) विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण यांनी विक्रीतून एकूण जमा झालेला महसूल याबाबत चालू आर्थिक वर्षाचा तपशिल सोबतच्या विहीत विवरणपत्रात प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करावा.

१०. या बाबतचा खर्च "मागणी क्र. सी-७, मुख्य लेखाशिर्ष-२४०६ वनीकरण व वन्यजीवन-१०१-वन संरक्षण व विकास व पुनर्निमीत-(११) (३४) (२४०६ ८५५१) (योजनेत्तर) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सन २०१९-२० वर्षाकरिता मंजूर केलेल्या निधीतून भागविण्यात यावा".

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६१७१७२३३३८८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DAMODHAR SITARAM DALVI

Digitally signed by DAMODHAR SITARAM DALVI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=ef72079fa46879c38e604681191069c57000e73e78700748258ef7a9095f84d9, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=f62a7252ed770981b2324209adc4d21c5f260d6817740e3a114e91e153b61422, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=DAMODHAR SITARAM DALVI
Date: 2019.06.17 17:28:43 +05'30'

(दामोधर दळवी)
कार्यासन अधिकारी

प्रति,

१) प्रधान मुख्य वन संरक्षक, (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) विभागीय आयुक्त (सर्व).
५) मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) (सर्व).
६) वन संरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त कोकण-ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
७) जिल्हाधिकारी (सर्व).
८) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व).
९) उप वनसंरक्षक (प्रादेशिक) (सर्व).
१०)विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग (सर्व).
११) विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (सर्व).
१२) सहसंचालक (कृषी), (सर्व).
१३) जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी (सर्व).
१४) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
१६) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१७) अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.
१८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१९) कार्यासन अधिकारी, व्यय-०६/अर्थ-१७, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२०) कार्यासन अधिकारी, ब-१ महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई-३२.
२१) कार्यासन अधिकारी, फ-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२२) निवडनस्ती/फ-११.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. साववि-२०१९-/प्र.क्र.५४/फ-११,
दिनांक १५/०६/२०१९ सोबतचे विवरणपत्र

अ.क्र.	तयार करण्यात आलेल्या एकूण रोपांची संख्या (लाखात)	एकूण विक्री झालेल्या रोपांची संख्या (लाखात)	विक्रीतून वसूल झालेली रक्कम (रुपये हजारात)	शिल्लक राहीलेल्या रोपांची संख्या (लाखात)
१	२	३	४	५

उप वनसंरक्षक,
(सदस्य सचिव, ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम)
जिल्हा ....

(शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. सावधि-२०१९-/प्र.क्र.५४/फ-११, दिनांक १५/०६/२०१९ सोबतचे सहपत्र)

रोप मागणी पत्र / अर्ज

प्रति,
उपवनसंरक्षक,
सदस्य सचिव,
५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम
......................जिल्हा

विषय :- इतर शासकीय यंत्रणाद्वारे ३३ कोटी वृक्ष लागवडी करीता मोफत रोपांचा पुरवठा होणेबाबत.

महोदय,

मी..पदनाम.........
..............................जिल्हा यंत्रणाप्रमुख..........................प्रमाणित करतो की, शासन निर्णयानुसार ३३ कोटी वृक्ष लागवड करीता आमच्या ....यंत्रणेस............................एवढे लक्षांक (उद्दिष्टे).......................देण्यात आलेले आहे. त्या पैकी आज दिनांक................रोजी एवढे....................स्थानांवर एकूण..............खड्डे पुर्णत: खोदून झालेले आहेत.

सदर ठिकाणी लागवडीकरीता........................रोपाची गरज आहे.

१) सदर रोपे शासकीय दरात घेण्याकरीता आमच्या यंत्रणे जवळ रोपलागवडीकरीता अनुदान उपलब्ध नाही.

२) सदर रोपे खरेदी करीता आम्ही /इतर स्त्रोतातून प्रयत्न केला परंतु निधी उपलब्ध झालेला नाही.

३) आमच्याकडे कार्यालय खर्च व इतर किरकोळ खर्चाकरिता सुद्धा अनुदान उपलब्ध नाही.

करीता आम्हाला लागणारे..........................रोपे मोफत उपलब्ध करुन देण्यात यावे ही विनंती. उपलब्ध रोपे स्वतंत्र नोंदवहीमध्ये नोंद घेतली जातील व वरिष्ठ कार्यालयास याबाबत कळविण्यात येईल.

दिनांक — आपला,

स्थान — सही
नाव
पदनाम
जिल्हा